Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक २] शुक्रवार, जानेवारी २०, २०२३/पौष ३०, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. २.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा :—**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. विकाअ-१११५-प्र. क्र. ८८-५, दिनांक ३१ डिसेंबर २०१५.

**आदेश**

क्रमांक-एमएजी-कार्या-८-टे.३-सां.ले.-१३४१-२०२२.—

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी, चंद्रपूर खालील अनुसूचिमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त एकूण ०२ व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.—

त्यांची ही नियुक्ती, नियुक्तीच्या आदेशापासून ०५ वर्षासाठी असेल, विहीत कालावधीनंतर ती आपोआप संपुष्टात येईल. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्याचेविरूद्ध गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय सुद्धा, कोणतीही पूर्वसूचना न देता विशेष कार्यकारी पदावरील नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्यात येईल. मुदत संपताच किंवा त्यापूर्वी संपुष्टात आणण्यात आल्यास विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे तात्काळ परत करण्याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त केलेल्या विशेष कार्यकारी अधिकारी यांची राहील.

(१) विशेष कार्यकारी अधिकारी हे खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडण्यास सक्षम राहतील :—

(अ) **साक्षाकंनाचे काम :–**साक्षांकनासाठी पडताळणीसाठी किंवा यथास्थिती अधिप्रमाणसाठी त्यांच्यापुढे आणलेल्या मूळ दस्तऐवजांचे साक्षांकन, पडताळणी किंवा अधिप्रमाणन मूळ कागदपत्रे पाहूनच छायांकित प्रतीवर रबरी शिक्क्यांची मोहोर उमटवून दिनांकासह स्वाक्षरी करणे व स्वाक्षरी खाली स्वतःचे नावही लिहून साक्षांकन करावे. तसेच, मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रावर जर साक्षांकन केल्यास साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील व अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीस अपात्र ठरेल.

(ब) उत्पन्न प्रमाणपत्र देण्याचे अधिकार विशेष कार्यकारी अधिका-यांना नसतील.

(क) ओळखपरेड तसेच मृत्युपूर्व जबानी यासाठी विशेष कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित राहू नये.

(२) नियुक्त करण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिका-यांना मोहोर उमटविण्यासाठी शिक्का नजिकच्या पोलीस स्टेशनकडून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, साक्षांकित केलेल्या व्यक्तींची माहिती एका नोंदवहीत न चुकता नमूद करावी. ज्यावेळेस या नोंदवहीची अवलोकनासाठी मागणी पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडून केली जाईल त्यावेळी ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

(३) उक्त शासन निर्णयाद्वारे केलेल्या विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्या मानसेवी असून त्यांना सोपविण्यात आलेल्या वरील कामाबाबत कोणतेही मानधन, वेतन किंवा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

(४) प्रत्येक विशेष कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या नियुक्तीची वैधता सुस्पष्टपणे दर्शविणारे प्रमाणपत्र आपल्या विशेष कार्यकारी अधिकारी पदाच्या कामाच्या जागी सर्वांना सहजपणे दिसेल अशा ठिकाणी लावावे व या कामासाठी येणा-या व्यक्तीने मागणी केल्यास ते त्या व्यक्तीस दाखवावे.

(५) खाली दर्शविलेल्या अनुसूचिप्रमाणे गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त एकूण ०२ व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे नाव | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | श्री. बबन भिकाजी भारस्कर | २०२२/१३/४९०१३५८०९६९०/०१ |
| २ | श्री. अरविंद सखाराम जनबदकर | २०२२/१३/३५३३७७९२३६३९/०२ |

चंद्रपूर :
दिनांक ३० डिसेंबर २०२२.

**विनय गौडा जी. सी.,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.